# MT - 162

**2015 .... .... 1100**

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - I**

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | 'शब्देविण संवादिजे' या अवस्थेपर्यंत **दोन अपरिचित व्यक्ती** जाऊ शकत नाहीत. | **1** |
| 2) | खादी व स्वदेशी हे **जीवनव्रत होते.** | **1** |
| 3) | त्या तेजस्वी नेत्रांत **शांत भाव तरळत होता.** | **1** |
| 4) | मास्तर स्वत: कधीच **कॉलेजची पायरी चढले नव्हते.** | **1** |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | 'हा कोण लागून गेला **टिक्कोजीराव**, आपल्या घरात येऊन झोपणारा ?' | **1** |
| 2) | शेताच्या कर्त्याकडून अम्मा **भात** आणायची. | **1** |
| 3) | बाबांचं घराणं **मालगुजाराचं**. | **1** |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | येणारी पिढी मुक्त आणि स्वतंत्र असली पाहिजे. | **1** |
| 2) | केशवच्या वडिलांना गावात सगळे 'बाबूजी' म्हणतात. | **1** |
| 3) | आवाज कुणाचा हे ठरविण्यासाठी मंदार, मानसी कुणीतरी लपून बसल्याचा, मानसीचे स्वप्न, मुलं पळवणारी टोळी, वारा आणि जादूचं मोरपीस असणार असा तर्क करतात. | **1** |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील वाक्य 'हिमालय' या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठाचे लेखक 'प्रभाकर पेंढारकर' आहेत. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे.<br>**स्पष्टीकरण** : लेखक हिमालयात असताना एकदा पावसाच्या थेंबांचा आवाज सोडला तर रात्रीच्या वेळी सारंच शांत होतं. हिमशिखरावर रेंगाळणारे ढग खाली उतरले होते. त्यामुळे दूरवरचा किन्नोर कैलास, बलदंड देहाचा रारंग ढांग आणि त्याला विळखा घालून वाहणारी सतलज नदी या सर्वच गोष्टींचं अस्तित्व हरवून गेलं होतं. हे सगळचं अंधारात दिसेनासं झालं होतं. तशातच लेखक टेबलावरच्या कंदिलाच्या प्रकाशात कागद आणि पेन घेऊन लिहिण्यासाठी बसले होते. त्यामुळे अस्तित्व उरलं होतं ते केवळ एवढ्याच गोष्टींचं. त्यामुळे लेखकाला एकांतवास जाणवू लागला होता. पण या एकांतवासातही लेखक कागद व पेनाच्या माध्यमातून संवाद साधत होता. हिमालय, किन्नोर कैलास, रारंग ढांग या सर्वांबद्दल तो वाचकांशी एकप्रकारे गप्पाच मारत होता. म्हणूनच लेखकाने वरील विधान केले आहे.<br>**वैशिष्ट्य** : माणूस समाजशील प्राणी आहे, तो एकटा कुठेही राहू शकत नाही हे येथे दिसून येते. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **<u>संदर्भ</u>** : वरील वाक्य 'परिवर्तनाचे उत्सव' या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठाची लेखिका 'विद्या बाळ' या आहेत. समाजात स्वत:ची ओळख निर्माण करावी, हे सूचित करणारे हे विधान आहे.<br>**<u>स्पष्टीकरण</u>** : निसर्गातील ऋतुबदलानुसार आपण अनेक उत्सव मित्रमैत्रिणी व नातेवाईकांसोबत पारंपरिक पद्धतीने साजरे करत असतो. लेखिकेच्या मते आपण त्यात काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. सर्व जातिधर्मांच्या, सर्व प्रकारच्या स्त्रीपुरुषांना सामावून घेऊन निसर्गाशी नाते जोडत आनंदाने हे उत्सव साजरे केले पाहिजेत. परंतु यामध्ये कुणाकुणाला आपली स्वत:ची ओळख हरवते असे वाटते. लेखिका याबाबतीत म्हणते की, हा सवयीचा आणि मनावरच्या वर्षानुवर्षांच्या संस्कारांचा परिणाम आहे. खरे तर स्वत:ची ओळख प्रस्थापित करण्यासाठी केवळ लग्न, नवरा, जात, धर्म यांचाच आधार उपयुक्त नसतो. आपले विचार, आपले वागणे, आपल्याजवळचे एखादे कौशल्य, एखादी कला, एखाद्या कामाची बांधिलकी यामुळेही आपली ओळख स्पष्ट होत असते. लेखिकेच्या मते, सार्वजनिक जीवन जगताना आपण कुणाचे कुणीतरी नातेवाईक अशा ओळखीपेक्षा आपण 'अमुक अमुक' ही ओळख जास्त अर्थपूर्ण आणि महत्त्वाची ठरते.<br>**<u>वैशिष्ट्य</u>** : सार्वजनिक जीवनात स्वत:ची स्वतंत्र ओळख असणे महत्त्वाचे आहे हा विचार येथे दिसून येतो. | **3** |
| उ.२. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**<br>**(टीप : प्रत्येक दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरामध्ये सुरूवातीला प्रस्तावना लिहावी.)** | |
| 1) | नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटरप्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुलं माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होणार असतो पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारुळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. ज्यामुळे सूर्यकिरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वत:ही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या.<br>वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते. | **3** |
| 2) | आदिलशहा बादशहाने पन्हाळ्याला शादुद्दीन कतालवलींच्या कबरीवर दर्गा बांधला आहे. शेजारीच त्यांची पत्नी बेबी फातिमा आणि छोटा मुलगा मासूम यांच्या तुरबती आहेत. या दर्ग्याची देखभाल करण्यासाठी बादशहाने मुजावरांना नियुक्त केले. त्यांना गुढ्यातील व इतर ठिकाणी भरपूर जमिनी इनाम म्हणून दिलेल्या आहेत.<br>अशाप्रकारे आदिलशहाने पन्हाळ्याचा दर्गा बांधला आणि त्याची देखभाल करणाऱ्या मुजावरांना जमिनी इनाम म्हणून दिल्या. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 3) | मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजूत असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो. पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष, जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळिकीमुळे चमत्कारिक अवघडलेपण वाट्याला येते. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहीत असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.<br>या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते. | 3 |
| 4) | सुर्वे यांच्या कवितांची पहिली श्रोता कृष्णाबाईच असायच्या. कविता लिहून झाली की सुर्वे ती कविता लेखिकेला वाचून दाखवायचे. सुर्वे कविता लिहितात याचा आनंद लेखिकेलाही व्हायचा. पण तो आनंद कसा व्यक्त करायचा, हे त्यांना समजत नसे. अनेकदा संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द त्यांच्या कानावर पडायचे, पण त्यातला भाव लेखिकेला समजायचाच नाही. कारण त्यांचे स्वत:चे मन त्यांना सांगायचे की कृष्णाबाई तुला काही कळतंय का त्यातलं ? कारण एक तर तू अडाणी बाई आहेस ? तुला काही समजणार नाही आणि बावळटासारखं उगाच काहीतरी बोलून स्वत:चं हसू करून घेशील.<br>अशाप्रकारे कृष्णाबाई स्वत:च्या न्यूनगंडामुळेच गप्प बसायच्या. म्हणूनच त्या म्हणतात, 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे.' | 3 |
| 5) | जेव्हा केशवने लेखकाला आपला बंगला दाखवला तेव्हा केशवच्या बंगल्यात लेखकाला माणुसकी कुठेच दिसली नाही. फक्त व्यवहार आणि पैसा दिसत होता. केशव अगदी भरभरून आपल्या बंगल्याचे, एकेक वस्तूचे कौतुक करत होता. ते वर्णन ऐकून, पाहून लेखक थकून गेला होता. त्याचे डोके खूप दुखत होते. तो जेवला आणि तोंडावर पांघरूण घेऊन झोपला. पण त्याला झोप येत नव्हती. तो खूपच अस्वस्थ झाला होता. लेखक विचार करत होता. गावातल्या माणसाला केशवने घरी बोलावले नव्हते तर त्याच्या बंगल्याची श्रीमंती बघायला बोलावले होते. बंगल्याला केशवने 'बाबूजी' नाव दिले होते. पण घरात बाबूजींचं अस्तित्व कुठेच जाणवत नव्हते. साऱ्या गप्पांमध्ये केशवने गावी राहणाऱ्या विधवा आईची साधी चौकशीही केली नव्हती. लेखकाने न राहवून सांगितले तर त्याने ऐकून न ऐकल्यासारखे केले. 'कुठून आपल्याला दुर्बुद्धी सुचली.' असा विचार लेखकाच्या मनात येऊन गेला. स्वत:भोवती विशिष्ट प्रकारचं वलय निर्माण करून जगणाऱ्या माणसाच्या घरात राहण्यापेक्षा बस स्टॅण्डवरच्या बाकावर झोपलो असतो तर शांत झोप लागली असती, असा एक विचार त्याच्या मनात आला.<br>केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात असे वेगवेगळे विचार आले. | 3 |
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | संतांचे दर्शन झाल्यावर संत सेना महाराज यांना सुख झाले. | 1 |
| 2) | समता निर्माण होण्यासाठी रक्ताचे पाणी करावे असे कवितेतील स्त्रीला वाटते. | 1 |
| 3) | कवितेतील घरट्यात बालरवि-किरणांची प्रभावळ नाचते. | 1 |

उ.३. **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.**

1) भावमय किमया ही **हृदयीच्या** दौलतीची ? 1

2) **हिरवेगार** पीक नाचते काळ्याभोर शिवारी. 1

3) मातीलाही सुगंध यावा **कष्टाच्या** भाकरीचा. 1

उ.४. **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.**

1) **संदर्भ:** वरील ओळी 'आजि सोनियाचा दिवस' या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. 'संत सेना महाराज' यांनी हा अभंग लिहिला आहे. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन येथे केले आहे. 3

**स्पष्टीकरण :** संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला. त्यांच्या मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला. दिवाळी-दसरा आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला. थोडक्यात संतांचे आगमन म्हणजेच सेना महाराजांसाठी दिवाळी-दसरा आहे.

**वैशिष्ट्य :** येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते.

2) **संदर्भ:** वरील ओळी 'गाव' या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. त्याचे कवी 'अनिल पाटील' आहेत. येथे गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे. 3

**स्पष्टीकरण :** गावातील निसर्गसौंदर्याचे वर्णन कवी अगदी भावूकपणे करतो. त्याच्या गावी वेडीवाकडी वळणे घेत घेत वाहणाऱ्या नदीत खळखळणारे पाणी आहे. हे सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी सर्वत्र भिरभिरते. या सौंदर्याचे वर्णन करताना त्याला शब्दच सापडत नाहीत म्हणून त्याची वाणी अबोल होते. जणू निसर्गाच्या सौंदर्यात, त्या धुंद वातावरणात कवीचे मन शांत शांत होत जाते.

**वैशिष्ट्य :** निसर्गसौंदर्याचा मानवी मनावर होणारा सुखद परिणाम येथे दिसून येतो.

उ.४. **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**

**(टीप : प्रत्येक दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरामध्ये सुरूवातीला प्रस्तावना लिहावी.)**

1) संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस त्यांच्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते त्याचप्रमाणे संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दु:ख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे. 3

अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे.

| | | |
|---|---|---|
| 2) | कवीचे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कवीला आपले गाव खूप खूप आवडते, परंतु असे असले तरी पोट भरण्यासाठी त्याला दूर शहरात जावे लागले. वीतभर पोटासाठी त्याला आपले लाडके गाव सोडावे लागले. त्यामुळे गावाच्या अनावर ओढीने त्याचे मन बेचैन होते, अस्वस्थ होते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे गाव आठवणींच्या रुपात दिसू लागते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव निघून जातात. गावाच्या आठवणींमुळे त्याच्या मनाला शांतता, समाधान लाभते.<br>अशाप्रकारे जेव्हा कवीला त्याचे गाव आठवणीतून डोळ्यांसमोर दिसते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव नाहीसे होतात. | **3** |
| 3) | ग. दि. माडगूळकर श्रमाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात की, परमेश्वर देवालयात किंवा मंदिरात राहत नाही. ज्याठिकाणी माणसे कष्ट करतात तेथे परमेश्वर असतो. या परमेश्वराला मुनिब्राम्हणांच्या मंत्र-तंत्रापेक्षा कष्टाळू माणसांच्या श्वासांचा, तसेच काम करताना त्यांच्या अवजारांचा होणारा आवाज आवडतो. शेतकरी आपल्या शेतात घाम गाळून कष्ट करतो. तेथे श्याम अन्नधान्याच्या रूपात उभा राहतो. पाथरवट रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना वेगवेगळे आकार देतात. शिवाय विणकर लोक अपार मेहनत करून कापसापासून छान कापड बनवतात. अशा कष्टाळू लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो. याचाच अर्थ असा की, जिथे घाम गाळून कष्ट केले जातात तेथे परमेश्वराचे अस्तित्व असते.<br>अशाप्रकारे जीवनातील श्रमाचे महत्त्व पटवून देतांना कवी जणू सुचवतात की, कष्ट करा, मेहनत करा,तिथेच परमेश्वराची प्राप्ती आपणाला होईल. | **3** |
| 4) | कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | **3** |
| 5) | समाजातील चालीरिती, रूढी, जातीव्यवस्था इ. गोष्टींमुळे माणसातील माणूसपण हरवत चालला आहे. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो. अशावेळी कवीला वाटते की, खूप मोठा प्रलय व्हावा. ज्यायोगे स्वार्थाने, मी पणाने भरलेली घरे व शहरे म्हणजेच स्वार्थी सामाजिक समूह नष्ट व्हावेत. त्या जागेवर एकाच आकाराची, विचाराची, उंचीची भेदाभेदरहित घरे व शहरे निर्माण व्हावीत. माणसाचे विचार समाजातील जुन्या वाईट विचारांना धरून पुढे जात आहेत. त्यामुळे असा प्रलय व्हावा की विचारांचे प्रवाह बदलावेत आणि चांगल्या विचारांच्या झऱ्यांनी तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी. त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल व समानता निर्माण होईल. त्याचप्रमाणे 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण होईल. समाजात सकारात्मक बदल होऊन मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध येईल.<br>अशाप्रकारे माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त व्हावी असा प्रलय कवीला अपेक्षित आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| उ.५. | **खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.**<br>**(टीप : प्रत्येक दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरामध्ये सुरूवातीला प्रस्तावना लिहावी.)** | |
| 1) | चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघंही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही चिनारचे खूप कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून दयावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचे. पण वेळच मिळायचा नाही. मनाला वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटले.<br>अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटायचे. | **4** |
| 2) | प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजवताना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकवण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजुरीचा भंडारा, पंढरपुरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते.<br>दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पैलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपुरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपुरी संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.<br>अशाप्रकारे वरील उदाहरणामुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते. | **4** |
| 3) | १९४२ ला मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरोधात 'चले जाव' ची घोषणा दिली. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगतही झाले. देशभरात | **4** |

| | | |
|---|---|---|
| | सगळीकडे 'चले जाव' आंदोलन तीव्र बनले. या आंदोलनाचे लोण ग्रामीण भागातही पसरले. अनेक ठिकाणी प्रचंड जमावाने इंग्रज सत्तेविरूद्धचा असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोस्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. सातारा जिल्ह्यात कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर, शिराळा, आटपाडी येथे मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते. इंग्रजांनी या प्रचंड मोर्चावर गोळीबार केला. त्यामध्ये वडूज मोर्चात ९ तर इस्लामपूर मोर्चात २ कार्यकर्ते हुतात्मा झाले. अनेकजण जखमी झाले. अनेकांना तुरूंगात डांबले गेले. त्यातूनच पुढे स्वत:चे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे, या विचाराने गावागावात 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागातही पसरले. | |
| 4) | लेखिकेला आपल्या नातवंडांबद्दल खूप प्रेम वाटते. तिला वाटते की, या मुलांना लाड करून घेण्याची, भरभरून प्रेम मिळण्याची सवय झाली आहे. पण ही मुले जशी मोठी होतील तसे त्यांच्या लक्षात येईल की, घरात मिळणारे सौजन्यपूर्ण वातावरण बाहेरच्या जगात मिळणार नाही. कारण या जगात वेगवेगळ्या वृत्तींची, स्वभावाची माणसे आहेत. हिंसा, अभिलाषा, मत्सर या अपप्रवृत्ती समाजात पसरलेल्या आहेत. दुर्दैवाने मुलांना शाळकरी वयात या गोष्टी शिकायला मिळत आहेत. लेखिकेला वाटते की, मुलांनी मोठे होता होता या शत्रूंना जिंकायला पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रत्येक दिवसाची सुरुवात प्रार्थनेने करावी. सर्वांनी एकोप्याने राहावे. शिवाय कुणाविरूद्ध द्वेष ठेवू नये. आपल्याला भरभरून देणाऱ्या निसर्ग, शेतकरी यांच्याबद्दल कृतज्ञतेची भावना मनात ठेवावी. पुस्तके, शब्द, वाचन यांना महत्त्व दिले पाहिजे. जितक्या जास्तीत जास्त जणांना आनंद देता येईल तेवढा त्यांनी दिला पाहिजे. साऱ्या जगासाठी आशीर्वाद बनले पाहिजे.<br>अशाप्रकारे रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागावे असे लेखिकेला वाटते. | **4** |
| | <u>**किंवा**</u><br>**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**<br>**(टीप : प्रत्येक दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरामध्ये सुरूवातीला प्रस्तावना लिहावी.)** | |
| 1) | जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे. | **8** |

एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपाक्कन चिनारच्या डोक्यावर पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. म्हणून आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.

भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार व जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाही. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे, खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले.

2) लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्टप्रवृत्तींपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरुवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. कधीही कुणाचा द्वेष करू नका. **8**

ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले, तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहरी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.

अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडांस सांगते, स्वत: जगा व दुसऱ्यांना जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा.

उ.६. **अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.**

1) दोन विद्‌वान माणसांची गोष्ट सांगतात. **2**

2) नागीण मुंग्यांच्या बिळात शिरली. **2**

| | | |
|---|---|---|
| उ.६. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | पैसाअडका - पैसा, अडका वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| 2) | वृक्षलता - वृक्ष आणि लता - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| 3) | चतुर्वेद - चार वेदांचा समूह - द्विगू समास | **1** |
| 4) | निंदास्तुती - निंदा किंवा स्तुती - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| उ.६. | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | जरा बाहेर येऊन बसता का ? | **1** |
| 2) | मी अडाणी त्यावर काहीही बोलणार नाही. | **1** |
| 3) | किती छान गेला माझाही वेळ ! | **1** |
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | ताजमहालचे अप्रतिम सौंदर्य पाहून मुले **<u>स्तंभित झाली.</u>** | **1** |
| 2) | एन्.सी.सीच्या कॅम्पमुळे भित्रा अजय **<u>धीट झाला.</u>** | **1** |
| 3) | राधा काम करताना खूप गोष्टींची **<u>सांडलवंड करते.</u>** | **1** |
| 4) | विनाकारण एखाद्याला **<u>उपद्रव देणे</u>** हा जणू महेशचा छंदच बनला आहे. | **1** |
| 5) | वर्षभराने गावी आलेल्या जयला आजीने **<u>छातीशी धरले.</u>** | **1** |
| 6) | सचिनचा खेळ बघून आपण नेहमीच **<u>थक्क होतो.</u>** | **1** |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** | |
| 1) | नेहरूंना बालपणापासून कशाचा तिटकारा होता ? | **1** |
| 2) | नेहरूंच्या आगमनाने चळवळींना काय लाभले ? | **1** |
| 3) | नेहरूंनी कशाविरूद्ध जोरदार आवाज उठविला ? | **1** |
| 4) | नेहरूंनी देशसेवेसाठी काय अर्पण केले ? | **1** |
| उ.७. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 62 - Q.03 | **4** |
| उ.७. | **इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 95 - Q.01 | **4** |
| | **<u>किंवा</u>** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 109 - Q.1 | **4** |
| | **<u>किंवा</u>** | |

| | | |
|---|---|---|
| उ.७. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 116 - Q.3 | **4** |
| उ.८. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 04 - Q.04 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 27 - Q.24 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 40 - Q.37 | **10** |

❑❑❑❑❑